महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील पदव्युत्तर पदवी अर्हताधारक वैद्यकीय अधिकाऱ्यांना जिल्हा शल्य चिकित्सक संवर्गात तदर्थ पदोन्नती देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन आदेश क्रमांकः पदोन्न-११०७/प्र.क्र.३३८/सेवा-२
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार संकुल इमारत १० वा मजला
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
तारीख: २८ मे, २०१९

वाचा सामान्य प्रशासन विभाग, पत्र क्रमांक-बीसीसी-२०१७/प्र.क्र. ३१२ अे/१६-ब, दि. २९.१२.२०१७

शासन आदेश:-

महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील (वेतनश्रेणी रु. १५६००-३९१०० ग्रेड पे रु. ५४००) खालील पदव्युत्तर पदवीधारक वैद्यकीय अधिकाऱ्यांना "जिल्हा शल्य चिकित्सक" (वेतनश्रेणी रु. १५६००-३९१०० ग्रेड पे रु. ६६००) या संवर्गात निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे. सदर पदोन्नतीनंतर संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदस्थापना खालील विवरणपत्रामधील "स्तंभ-५" मध्ये त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी करण्यात येत आहे.

अ.क्र	वैद्यकीय अधिकाऱ्याचे नाव व सध्याची पदस्थापना	त्यांचा स्वत: प्रवर्ग	प्रवर्ग	पदोन्नतीनंतरची पदस्थापना
१.	२.	३.	४.	५.
१.	डॉ. डी. बी. बामणे, वैद्यकीय अधिकारी, उपजिल्हा रुग्णालय भोर, जि. पुणे	भ.ज.-ब	खुला	वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा रुग्णालय, भोर, जि. पुणे (रिक्त पदी)

३. डॉ. डी. बी. बामणे यांनी पदोन्नतीच्या अनुषंगाने मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल केलेल्या मुळ अर्ज क्र. ४३८/२०१८ मध्ये मा. न्यायाधिकरणाने डॉ. बामणे यांचे पदोन्नतीबाबत सुयोग्य निर्णय चार आठवडयात घेण्याबाबत दि. २९.०१.२०१९ रोजी आदेश दिले आहेत.

४. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र. २७९७/२०१५ मध्ये दि. ४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीमधील आरक्षण अवैध ठरविले आहे. मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात राज्य

शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ दाखल केला आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. खुल्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यास कोणतीही वैधानिक अडचण नसल्याचे अभिप्राय विधि व न्याय विभागाने दि. २८.१२.२०१७ रोजी दिले आहेत. त्यानुसार तूर्तास पदोन्नतीच्या कोटयातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून भरण्यात यावीत. अशी कार्यवाही करताना सेवाज्येष्ठता यादीमधील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देण्यापूर्वी ते दि. २५.०५.२००४ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार आरक्षणाचा लाभ मिळून सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत, याची खात्री प्रत्येक प्रशासकीय विभागाने करावी अशा सूचना सा.प्र.वि./का-१६-ब ने दि. २९.१२.२०१७ च्या पत्रान्वये दिल्या आहेत. त्यानुसार मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या न्यायनिर्णयाच्या अधीन राहून संबंधीत वैद्यकीय अधिकारी यांना जिल्हा शल्यचिकित्सक संवर्गात खुल्या प्रवर्गातील रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात तदर्थ पदोन्नती देण्यात आहे.

५. सदर पदोन्नती "जिल्हा शल्य चिकित्सक" या संवर्गातील पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार देण्यात येत आहे. सदरची पदोन्नती ही प्रशासकीय निकड म्हणून तात्पुरत्या स्वरुपातील तदर्थ पदोन्नती राहील.

६. सदर तदर्थ पदोन्नती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यततेच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

७. जिल्हा शल्य चिकित्सक संवर्गात दिलेली सदर तदर्थ पदोन्नती ही तात्पुरत्या स्वरुपात असून सदर पदावर संबंधित अधिकाऱ्याचा कायमस्वरुपी धारणाधिकार राहणार नाही. तसेच सदर पदोन्नतीमुळे संबंधित अधिकाऱ्यास नियमित पदाचे, सेवाज्येष्ठतेचे कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

८. पदोन्नती देण्यात आलेल्या अधिकाऱ्यांनी पदोन्नतीनंतर पदग्रहण केल्यापासून एक महिन्याच्या आत वेतन निश्चितीचा विकल्प द्यावा, असा विकल्प न दिल्यास त्यांची वेतन निश्चिती, महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम क्र. ११(१)(ए) नुसार पदोन्नतीचा दिनांक विचारात घेऊन करण्यात यावी.

९. संबंधित अधिकाऱ्यांना त्यांच्या पदोन्नतीनंतरच्या पदस्थापनेवर रुजू होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करण्यात यावे. संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांना दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी एक महिन्याच्या आत हजर होऊन, त्याबाबतचा अहवाल उपसंचालक, आरोग्य सेवा, संचालक, आरोग्य सेवा, मुंबई याना व शासनास सादर करावा. पदस्थापना बदलून घेण्यासाठी राजकीय दबाव आणल्यास सदर कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील तरतूदीनुसार शिस्तभंग विषयक कारवाईस पात्र ठरेल.

१०. संबंधित वैद्यकीय अधिकारी यांनी जिल्हा शल्यचिकित्सक संवर्गातील तदर्थ पदोन्नती न स्विकारल्यास सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३०३/का-१२, दिनांक १२.०९.२०१६ अन्वये त्यांचे नांव सन २०१८-१९ या वर्षीच्या निवडसूचीतून काढून टाकण्यात येईल व पुढील

दोन वर्षी होणाऱ्या निवडसूच्यामध्ये त्यांच्या नावांचा विचार न करता तिसऱ्या वर्षाच्या निवडसूचीत जिल्हा शल्यचिकित्सक संवर्गात तदर्थ पदोन्नतीसाठी त्यांची पात्रता तपासण्यात येईल.

११. सदर जिल्हा शल्यचिकित्सक संवर्गातील तदर्थ पदोन्नती ही त्यांच्याविरुध्द प्रस्तुत आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरु झालेली नाही वा प्रस्तावित नाही या धारणेच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

१२. पदोन्नती दिलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांना कार्यमुक्त केल्यानंतर नवीन पदस्थापनेवर विहित मुदतीत हजर व्हावे. जे अधिकारी विहित मुदतीत पदोन्तीवर हजर होणार नाहीत ते पदोन्नतीस इच्छुक नाहीत असे गृहीत धरुन त्यांची पदोन्नती रद्द करण्यात येईल. तसेच त्यांना देण्यात आलेला आश्वासीत प्रगती योजनेचा लाभ काढून घेण्यात येईल. या प्रकरणी संबंधित उपसंचालक यानी संबंधित अधिकाऱ्यांना कार्यमुक्त केल्यानंतर नवीन पदस्थापनेच्या ठिकाणी वेळीच हजर होतात किंवा नाही याबाबतचा अनुपालन अहवाल विहित कालमर्यादेत शासनास सादर करावा.

१३ सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५२८१३२२३००७१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vishnudas Pundlikrao Ghodke

Digitally signed by Vishnudas Pundlikrao Ghodke
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=514c2e5ad6ac71c69b99a86a5fe5189556b7a95d5896bbb81496f403bb58ac3e, serialNumber=9ab69d6945f8950a9525831f8ae9726be295d17576e78d19fa8f6cb952bb04a0, cn=Vishnudas Pundlikrao Ghodke
Date: 2019.05.28 14:25:12 +05'30'

(वि. पुं. घोडके)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सचिव, महाराष्ट्र लोक सेवा आयोग, मुंबई (पत्राने)
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
३. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई
४. सह संचालक, आरोग्य सेवा (अ. व प्र.) मुंबई
५. उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ पुणे
६. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, औंध, पुणे
७. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखापरीक्षा), मुंबई/नागपूर

८. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
९. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
१०. मा. मंत्री (आरोग्य)/मा. राज्यमंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
११. सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-१२ व १६-ब, मंत्रालय, मुंबई
१२. वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय भोर, जि. पुणे
१३. प्रधान सचिव (सा.आ.) यांचे स्विय सहायक
१४. सर्व सह सचिव/उप सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. डॉ. डी. बी. बामणे, वैद्यकीय अधिकारी, उपजिल्हा रुग्णालय भोर, जि. पुणे
(संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे मार्फत)
१७. निवडनस्ती सेवा-२